## नि.दि.मु.क्र. ०४/२०११ मधील आयए क्र. १/२०१९ (निशाणी १२२) वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींचे असे म्हणणे आहे की प्रस्तुत दावा हक्कप्रस्थापनेकरीता, प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी बेकायदेशीरपणे करुन दिलेली दावा मिळकतीबाबतची खरेदीखते वादींवर बंधनकारक नसल्याचा ठराव होण्याकरीता, कायमच्या ताकिदीकरीता तसेच कब्जा गेला आहे असे झाल्यास कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादींनी कैफियती दाखल करुन वादींनी दाव्यात वंशावळ दिलेली नसल्याचे तसेच श्रीमती काशिबाई कोम शंकर गावकर हिस सदरचे दावा मिळकतीचे जमिनीचे क्षेत्र विक्री करण्याचा हक्कसंबंध नव्हता व नाही असे कथन केलेले आहे. त्यामुळे वादींना दाव्यात दुरुस्ती करणे भाग झालेले आहे. वादी दाव्यातील मथळयात कब्जा गेला आहे असे झाल्यास कब्जा मिळणेकरीता व दावा मिळकतीचे सरस निरस वाटप होवून मिळण्याकरीता असा मजकूर वाढविण्याची परवानगी मागत आहे. तसेच परिच्छेद क्र. १ च्या खाली नवीन परिच्छेद क्र. १अ करुन त्यात वादींचे पुर्वाधिकारी यांच्याकडे जमीन मिळकत कशी आली व त्या मिळकतीच्या चतुःसीमा नमूद करुन मागत आहे. त्याचप्रमाणे नवीन परिच्छेद क्रमांक १ब मध्ये त्यांचे पुर्वाधिकारी कोण होते याबाबतचा मजकूर नमूद करण्यास परवानगी मागत आहे. तसेच नवीन परिच्छेद क्रमांक ११अ समाविष्ट करुन दावा मिळकतीबाबतची, त्याच्या कब्जाबाबतची व शेत मांगराबाबतची कथने समाविष्ट करण्याची परवानगी मागत आहे. तसेच

दाव्याच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये नवीन पोटकलम 'ल' समाविष्ट करुन त्यात सरसनिरस वाटपाची व कब्जाची दाद समाविष्ट करण्याची विनंती वादींनी केली आहे. वादींचे असे म्हणणे आहे की सदरच्या दुरुस्तीने मुळ दाव्याच्या स्वरुपात कसल्याही प्रकारचा बदल होणार नाही. तसेच सदरच्या दुरुस्तीने प्रतिवादींच्या हक्कांवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होणारा नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की दुरुस्तीची परवानगी नाकारल्यास वादींचे कधीही भरुन न निघणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट, दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे न्यायाच्या पुर्तेकरीता सदरचा अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ६, ८, १० व १३ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत घेतलेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की प्रस्तुत दावा हा ५ वर्षांपेक्षा जास्त जुना असल्याने मा.नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे त्यांची लवकरात लवकर चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र वादी दाव्याकामी मुद्दामहून वेळ काढत आहे व त्यासाठी ते प्रत्येकवेळी नवीन स्वरुपाचे अर्ज देवून मुदती वाढून घेत आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की वादींना कोणतीही दुरुस्ती करुन मागता येणारी नाही. प्रस्तुत अर्ज या पुर्वी का देता आला नाही याचे कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १५ ने त्याचे स्वतःचे म्हणणे देवून प्रस्तुत अर्जावर आक्षेप नोंदविलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की प्रस्तुत दाव्याची सुनावणी सुरु झालेली असल्याने व वादींतर्फे साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र दाखल झालेले असल्याने वादींना दाव्यात दुरुस्ती करुन मागता येणारी नाही. तसेच त्याचे असेही म्हणणे आहे की प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादी दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल करु पाहत आहेत. त्यामुळे प्रस्तुत

अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

०४. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे व दोन्ही बाजूंच्या वादकथनांचे अवलोकन केले.

०५. वादींनी प्रस्तुत दावा हा ते दावा मिळकतीचे ४ आणे हिश्श्याचे खरेदीखताने मालक आहेत अशा हक्कप्रस्थापनेसाठी, प्रतिवादी क्र. १ ते ८ व १९ यांनी केलेली खरेदीखते वादींच्या हिश्श्यावर बंधनकारक नसल्याच्या ठरावासाठी, कायमची ताकीद व इतर ठराव आणि कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दाव्यास त्यांच्या कैफियती दाखल करुन त्यामध्ये वादींनी दाव्यात वंशावळ दिलेली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. प्रस्तुत दावा हा मालकीहक्काच्या ठरावाबाबतचा व इतर अनुषंगिक मागण्याबाबतचा असल्याने वादींची वादकथने परिपुर्ण असणे आवश्यक आहे.

०६. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास आक्षेप घेवून असे नमूद केले आहे की वादींचे साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे त्यांना आता दुरुस्ती करुन मागता येणारी नाही. तसेच त्यांचे असेही म्हणणे आहे की वादींनी प्रस्तावित दुरुस्ती यापुर्वी का करु शकले नाही याचे संयुक्तीक कारण दिलेले नाही. प्रस्तुत प्रकरणाचा रोजनामा पाहिला असता वादींनी त्यांचे साक्षीदारांचे शपथपत्र दाखल केल्याचे स्पष्ट होते. मात्र अद्याप साक्षीदाराचा उलटतपास सुरु झालेला नाही. त्यामुळे दाव्याची संपरिक्षा सुरु झाली असे म्हणता येणार नाही. सबब, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील परंतुकेची बाधा प्रस्तुत अर्जास येणार नाही असे माझे मत आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्त्या यापुर्वी न करण्यामागे कारण नमूद करणे आवश्यक नाही. सबब, प्रतिवादींचा आक्षेप फेटाळण्यास पात्र आहे. वादींनी

नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या **Chakreshwari Construction PVT. LTD. Vs. Manohar Lal** 2017 (5) **Mh.L.J**.195 या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवलेली आहे. सदर न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयाने अभिमत नोंदविले आहे की जर प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यातील पक्षकारांचे हक्काबाबतचा निर्णय करण्यास आवश्यक, सद्भावपुर्ण, संबंधीत असेल तर अशी दुरुस्ती ही दुसऱ्या अपिलात देखील मंजूर करता येते. वादींनी दाखल केलेल्या न्यायनिर्णयामधील अभिमत प्रस्तुत प्रकरणास तंतोतंत लागू होते.

०७. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की वादींनी ज्या प्रस्तावित दुरुस्ती त्यांच्या वादपत्रामध्ये करुन मागितल्या आहेत त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणारा आहे. मी वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत दावा हा मालकीहक्काच्या ठरावासाठी व इतर मागण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादींनी प्रस्तावित दुरुस्तीअन्वये दाव्यात त्यांच्या मालकी व कब्जाबाबत वादकथने समाविष्ट करुन मागितलेली आहेत. तसेच विनंती कलमामध्ये सरसनिरस वाटपाची दाद समाविष्ट करुन मागितलेली आहे. वादींची वादकथने पाहता ते दावा मिळकतीमध्ये ४ आणे हिश्श्याची मालकी मागत आहेत. त्यामुळे वादींची प्रस्तावित दुरुस्ती पाहता दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होताना दिसून येत नाही. किंबहुना वादींनी मागितलेल्या प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय करण्यास मदत होणारी आहे. दाव्याचे स्वरुप व टप्पा पाहता प्रस्तावित दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यांना प्रस्तावित दुरुस्तीस त्यांची कैफियत दाखल करता येणारी आहे.

०८. प्रतिवादींनी असा आक्षेप घेतला आहे की वादी वेगवेगळे अर्ज देवून

प्रस्तुत दावा लांबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दाव्याचा अभिलेख पाहता वादींनी आतापर्यंत वेळोवेळी दाव्यात दुरुस्ती करुन नवीन वादकथने समाविष्ट केल्याचे दिसते. तसेच निरनिराळे अर्ज दाखल केलेले दिसतात. ही बाब देखील खरी आहे की प्रस्तुत दावा हा २०११ पासून प्रलंबित असून ५ वर्षांपेक्षा जास्त जुनी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढावीत असे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. मात्र वर नमूद केल्याप्रमाणे वादींनी मागितलेली दुरुस्त्या या दाव्याच्या गुणदोषावर अंतिम निर्णय करण्यासाठी आवश्यक असल्याचे माझे मत झालेले आहे. तसेच प्रस्तावित दुरुस्तीने वादी हे त्यांच्या दाव्यात त्याच्या पुर्वाधिकाऱ्याबाबतची जी प्रस्तावित दुरुस्ती करुन मागत आहेत ती दाव्याच्या अंतिम निर्णयासाठी आवश्यक आहे असे मला वाटते. त्याचप्रमाणे वादींनी प्रस्तावित दुरुस्तीद्वारे परिच्छेद क्र. १अ मध्ये दावा मिळकतीच्या चतुःसीमा व परिच्छेद क्र. ११अ मध्ये त्यांच्या कब्जाबाबतची जी प्रस्तावित दुरुस्ती करुन मागितलेली आहे त्याने देखील प्रस्तुत दाव्याचा अंतिम निर्णय करण्यास मदत होणारी आहे. सबब, केवळ दावा ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित आहे या कारणासाठी वादींची मागणी फेटाळता येणार नाही. त्याऐवजी वादींवर योग्य तो खर्च आकारता येईल.

०९. वरील सर्व विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

वादींनी प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी करावी व दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयात

सादर करावी.

प्रस्तावित दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादींना त्यांची अतिरिक्त कैफियत देण्याची मुभा देण्यात येते.

वादींनी प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ५००/– प्रतिवादी क्र. ६, ८, १०, १३ व १५ यांना एकत्रीतरित्या पुढील तारखेपर्यत अदा करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.01.08 16:50:31 +0530

दि. ०८/०१/२०२१ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER